# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 26/10/2019 (शनिवार)
# (दुपार)

---

## अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील मौजा सिल्ली येथे दिनांक 15/10/2019 चे 13:00 वा. दरम्यान सुरेश बळीरामजी मेश्राम, वय 45 वर्ष, रा. सिल्ली हे त्यांच्या एमएच– 40/एसआर– 2919 क्रमांकाच्या मोटरसायकलने सिल्ली ते कुहीकडे जात होते. दरम्यान एमएच– 36/एडी– 8109 क्रमांकाच्या पल्सर मोटरसायकलच्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन सुरेश मेश्राम यांच्या मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात सुरेश मेश्राम हे जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी प्रथम पी.एच.सी. कुही व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 15/10/2019 चे 16:40 वा. त्यांचा मृत्यू झाला. संबंधीत कागदपत्र प्राप्त झाल्यावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा विकास बेलसरे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती सुचिता मांडवले या करीत आहे.

2) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत 19 कि.मी. अंतरावरील मौजा सातनवरी पेट्रोपंप समोर एमएच 6 रोड येथे दिनांक 24/10/2019 चे 23:00 वा. दरम्यान आरोपी नामे– अशोक भैय्यालाल सोनवाने, वय 52 वर्ष, रा. दाभा, ता. हिंगणा हे त्यांच्या एमएच– 40/एएल– 8227 क्रमांकाची मोटरसायकलने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन रोडच्या कडेला उभ्या असलेल्या डब्ल्युबी–23/डी–5774 क्रमांकाच्या ट्रकला मागुन धडक दिली. या अपघातात अशोक सोनवाने याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी सर तर्फे पोहवा पुरूषोत्तम धोंडे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. ठाकरे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष  
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर